# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### परिवहन विभागाने रद्द केलेली एक लाखाहून अधिक वाहने रस्त्यावर अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याबाबत

**(१) १६६१ (१५-०१-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन विभागाने रद्द केलेली एक लाखाहून अधिक वाहने, रस्त्यावर अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०३-२०१७) :** (१) व (२) परिवहन विभागाच्या वायुवेग पथकामार्फत करण्यात आलेल्या नियमित तपासणीत नोंदणी रद्द झालेले वाहन आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील प्रत्येक वाहनांची अत्याधुनिक पध्दतीने सविस्तर माहिती मिळावी या करीता हायसिक्युरिटी, रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याबाबत

**(२) १९२०८ (१२-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहन चोरी, खून, दरोडे यांसारख्या अनेक गुन्ह्यांमध्ये चोरींच्या वाहनांचा केला जाणारा वापर, अपघात झाल्यानंतर वाहनांच्या मालकांच्या तपासासाठी पोलीसांना होणारा त्रास कमी व्हावा याकरता, पोलीसांना प्रत्येक वाहनांची अत्याधुनिक पध्दतीने सविस्तर माहिती मिळावी या करीता हायसिक्युरिटी, रजिस्ट्रेशन नंबर प्लेट, माहे एप्रिल, २०१२ पर्यंत बसविण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२७ फेब्रुवारी, २०१२ रोजी देवूनही राज्यात त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षेबाबत सर्वात जास्त धोका राज्याला असतांनाही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहे,
(३) असल्यास, मा.सर्वाच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०३-२०१७) :** (१) केंद्रीय मोटार वाहन नियम ५० नुसार वाहनांवर हायसिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याबाबत मे.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी आदेश दिले असून अंतिम आदेश दिनांक १३/७/२०१६ रोजी देण्यात आले आहेत.
(२) व (३) सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याची योजना राज्यात राबविण्यासाठी जुलै, २०१३ मध्ये ई-निविदा सूचना प्रसिध्द केली होती. तथापि न्यायालयीन प्रकरणामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन मार्च, २०१४ मध्ये सुधारित निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा छाननीधिन असतांना सप्टेंबर, २०१४ मध्ये केंद्राचा नवीन रस्ता सुरक्षा विधेयकाचा मसूदा प्रसिध्द झाला. केंद्राच्या विधेयकातील प्रस्तावित तरतुदींमध्ये मोठे फेरबदल असल्यामुळे या प्रकरणात केंद्राचे मार्गदर्शन घेण्याचा तसेच निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार निविदा तयार करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभा (ता.जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांना पिक विम्याचा आणि पिक कर्जाच्या पुनर्गठनचा लाभ देणेबाबत**

**(३) २८८८८ (१३-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभा तालुका जिल्हा अमरावती येथील शेतकऱ्यांच्या पिक विमा रकमेची पिक कर्जात कपात न करता त्यांना पिक विम्याचा आणि पिक कर्जाच्या पुनर्गठन चा लाभ देणेबाबत संबंधित शेतकरी यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास विधानसभा सदस्य अचलपूर यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून सूचना केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिक विम्याचा आणि पिक कर्जाच्या पुनर्गठनाचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०३-२०१७) :** (१) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) टेंभा सहकारी सेवा संस्था मर्यादित, तालुका व जिल्हा अमरावती येथील बिगर कर्जदार व कर्जदार शेतकऱ्यांना प्राप्त झालेली पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्या बचत खाती जमा करण्यात आलेली आहे. कर्जदार शेतकऱ्यापैकी ज्या शेतकऱ्यांनी बँकेला पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम कर्ज खात्याला नावे टाकण्याबाबत संमती पत्र सादर केले आहे, अशा शेतकऱ्यांना प्राप्त झालेली नुकसान भरपाईची रक्कम रिझर्व बँकचे पत्र क्र.FIDD (MRO)३३६/१९-१-२००१-२०१५-१६ दि.२९.९.२०१५ नुसार त्यांच्या कर्ज खात्यात टाकण्यात आली. ज्या कर्जदार सभासदांनी रुंपातराचा लाभ घेवून चालू हंगामामध्ये नवीन पिक कर्जाची उचल केलेली नाही अशा कर्जदार सभासदांची प्राप्त झालेला नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्या बचत खाती जमा करण्यात आली. ज्या कर्जदार शेतकऱ्यांनी रुपांतराचा काम घेवून चालु हंगामामध्ये नवीन पिक कर्जाची उचल केलेली आहे अशाच कर्जदार सभासदांची प्राप्त नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्या कर्ज खाती जमा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या सेतू सुविधाबाबत**

**(४) ३४१९७ (२३-१२-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या सेतू सुविधा केंद्र व्यवस्थीत कार्यान्वित होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे सेतू सुविधा केंद्र महसूल विभागाच्या वतीने चालविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सेतू सुविधा केंद्र महसूल विभागानी सुरु करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०३-२०१७) :** (१) सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील मासेमारी करणारे छोटे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत**

**(५) ३५५१० (२३-१२-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व डहाणू परिसरात वारंवार बदलणारे हवामान व प्रदुषित सागरी किनारे व किनाऱ्यावरील मोठे-मोठे महाकाय फिशिंग ट्रालरचे तसेच पर्सनेट पध्दतीने मासेमारी करणारे परराज्यातील वाढते अतिक्रमण यामुळे पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणारे छोटे व्यावसायिक यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे मच्छीमार व्यावसायिकांवर अवलंबून असणारे वाहतूकदार, शीतगृहचालक, किरकोळ मासे विक्री करणाऱ्या कोळी महिला इ. आर्थिक अडचणींना वारंवार सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासन लहान मच्छिमारी व्यावसायिकांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०३-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) दिनांक ५.२.२०१६ व दिनांक ८.२.२०१६ च्या अधिसूचनेन्वये ट्रॉलर्स व पर्ससीननेटद्वारे करण्यात येणाऱ्या मासेमारीवर नियमन करण्यासाठी उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. तसेच परराज्यातील वाढते अतिक्रण रोखण्यासाठी पाच सागरी जिल्ह्याकरिता गस्ती नौका भाड्याने घेण्यासाठी मंजूरी दिली आहे. त्यामुळे परराज्यातील वाढते मासेमारीचे अतिक्रमण रोखण्यास मदत होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. सदाशिवनगर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) गावास गावठाण क्षेत्र मंजूर करण्याबाबत**

**(६) ३६४९८ (२०-०१-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. सदाशिवनगर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) गावास ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून या गावास गावठाण क्षेत्र मंजूर झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गठन नसल्यामुळे शासनाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावास गावठाण क्षेत्र मिळविण्यासाठी शेती महामंडळाकडील गट नं. ४१, ८९, ९१, २२१, या क्षेत्राची मागणी गेली १० वर्षापासून गावठाण संघर्ष समितीने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) पुरंदावडे, (ता.माळशिरस, जि.सोलापूर) या गावातून विभक्त झालेल्या ग्रामपंचायत सदाशिवनगर यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडै गावठाणासाठी जमिनीची मागणी केली आहे. तथापि मागणी केलेल्या काही गट खाजगी मालकीचे व काही गट महाराष्ट राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांच्या मालकीचे आहेत. गावठाणासंदर्भातील सदरची मागणी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून तपासण्यात येत आहे. या तपासणीत शेती महामंडळाकडील आवश्यक असलेल्या क्षेत्राची निश्चिती झाल्यानंतर त्या क्षेत्राची मागणी शेती महामंडळाकडे करण्यात येईल. शेती महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेचे गावठाणासाठी जमीन मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विभागाकडून ॲपची माहिती शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(७) ३७१४४ (१८-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वादळी वाऱ्यासोबत कोसळणाऱ्या अवकाळी पावसामुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानीचा जलद आढावा घेऊन शेतकऱ्यांना लवकर नुकसान भरपाई देण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात (इस्त्रो) ने दुष्काळ ॲप विकसीत केले असून केंद्र सरकारने किसान या महत्त्वकांक्षी योजनेअंतर्गत विदर्भातील आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्हयात प्रयोग करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दुष्काळी ॲपमुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत करणे शासनास सहज शक्य होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या सुरु असलेल्या खरीप हंगामाच्या काळात प्रयोग करुन धान (तांदुळ) कापसाच्या पिकांची झालेली नुकसानीची माहिती यात करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील कृषी विभागाकडून या ॲपची माहिती शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई परिसरातील रिक्षा व टॅक्सी चालकांच्या विविध प्रलंबित मागण्याबाबत**

**(८) ४१८४३ (२८-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई परिसरातील रिक्षा व टॅक्सी चालकांच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास बांद्रे येथील परिवहन आयुक्तालयावर धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑटोरिक्षा-टॅक्सीमेन्स संघटनेने केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, रिक्षा व टॅक्सीचालकाच्या समस्या सोडविण्यासाठी सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०३-२०१७) :** (१) होय.
(२) विविध परवाना शुल्क रद्द अथवा कमी करणे, ओला, उबेर, टॅक्सी फॉर शुअर यांसारख्या कंपन्यांच्या अवैध टॅक्सी सेवांवर बंदी आणणे, नवीन परवान्यांचे वितरण करणे, ऑटोरिक्षा - टॅक्सी मालक चालक यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणणे, पार्कींग व स्टँड उपलब्ध करुन देणे, प्रीपेड ऑटो सुरु करणे, अशा स्वरुपाच्या मागण्या मुंबई ऑटोरिक्षा व टॅक्सीमेन्स युनियन यांनी सदर शांततामय धरणे आंदोलनाद्वारे केलेल्या आहेत.
(३) सदर मागण्यांच्या अनुषंगाने दि. १५/०२/२०१६ रोजी परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. परवाना शुल्कामध्ये दि. १३.०७.२०१६ च्या अधिसुचनेअन्वये कपात करण्यात आली आहे तसेच समुच्चयक धोरणाची प्रारुप नियमावली दि. १५.१०.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात कोरडवाहूसाठी निवडलेली गावे बागायती निघाल्याबाबत**

**(९) ४३७६३ (२९-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कोरडवाहू शेतीला स्थैर्य प्राप्त करुन तेथे पाणलोट जलसंधारणाची कामे करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील निवडलेल्या ५० गावांपैकी १२ गावे बागायती असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) व (२) होय.

कोरडवाहू शेती अभियानामध्ये दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये ९७ गावांची निवड करण्यात आली होती. यामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील ५० गावापैकी १२ गावे बागायती असल्याचे जुलै, २०१५ मध्ये निदर्शनास आले होते. तथापि या गावामध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला नसल्याने या प्रकरणी शासनामार्फत कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात ऊसाची शेती करण्यास बंदी घालण्याबाबत**

**(१०) ४४१९८ (२७-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठवाड्यात सततचा पडणारा दुष्काळ विचारात घेवून मराठवाड्यात ऊसाची शेती करण्यास बंदी घालावी आणि साखर कारखाने बंद करण्यात यावेत अशी स्थानिक जनतेकडून मागणी दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली ३ वर्षे सततचा दुष्काळ आणि सध्याची पाणी टंचाईची गंभीर समस्या विचारात घेता राज्य शासनाने याबाबत कार्यवाही करुन कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१६-०३-२०१७) :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) मराठवाड्यात सततचा पडणारा दुष्काळ विचारात घेवून, कमीत कमी पाणी वापरातून जास्तीत जास्त क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी, नियमित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेशिवाय, मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर योजनेंतर्गत ३ वर्षाच्या कालावधीत रु. ३३७ कोटी एवढ्या रकमेचा सुक्ष्म सिंचनाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामधून १२५००० हे व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत

सुक्ष्म सिंचन योजनेमधून १,२५,००० हे असे एकूण २,५०,००० हे एवढे क्षेत्र तीन वर्षाच्या कालावधीत सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.कणेरी, (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. २३/१/१ ब व इतर मिळकतीबाबत महसूल खात्याच्या अभिलेख्यात करण्यात आलेले फेरफार रदद करण्याबाबत**

**(११) ४४६९७ (२०-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.कणेरी, (ता.भिवंडी जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. २३/१/१ ब व इतर मिळकतीबाबत महसूल खात्याच्या अभिलेख्यात करण्यात आलेले फेरफार क्र. २८०, ४४४ व ४४५ रद्द करण्याबाबत मा.महसूल मंत्री दिनांक १ जुलै, २०१४ रोजी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.महसूल मंत्री यानी आदेश देवूनही संबंधित भिवंडी तहसिलदार व प्रांताधिकारी यांनी फेरफार रद्द करण्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी श्री.वसंत जाधव व इतरांनी दिनांक ७ ऑगस्ट, २०१४ व दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अनेक वेळा मा.मुख्य सचिव, प्रधान सचिव (महसूल), महसूल आयुक्त, कोकण विभाग, तहसिलदार भिवंडी यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त जमिनीचे फेरफार रद्द करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०३-२०१७) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे कणेरी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.२३/१/१ ब व इतर या मिळकतीबाबत अपर आयुक्त, कोकण यांच्या दि.२६/०४/२०१३ च्या आदेशाविरुध्द श्रीमती भागिरथी मदन जाधव व इतर यांनी मा.मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. सदर अपिलाच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दि.०१/०७/२०१४ रोजी आदेश पारीत करुन अपर आयुक्त, कोकण यांचे उक्त आदेश कायम केले.

दरम्यान श्री.श्रीकांत वसंत जाधव यांनी मा.मंत्री (महसूल) यांच्या उक्त आदेशानुसार कार्यवाही न झाल्याने दि.१७ नोव्हेंबर, २०१४ च्या अर्जान्वये शासनाकडे तक्रार दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांच्या दि.०१/०७/२०१४ च्या आदेशाच्या अनुषंगाने गाव दप्तरी नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.३०४७, दि.१२/१२/२०१४ रोजी प्रमाणित करण्यात आला आहे.

---

**उल्हासनगर शहरात बनावट सनदेद्वारे शासकीय जागा हडप करण्यात येत असल्याबाबत**

**(१२) ४५७३६ (०६-०५-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरात महानगरपालिका, नगरभूमापन कार्यालय उपविभागीय कार्यालय यामधील अधिकाऱ्यांना हाताशी धरून बनावट सनद बनवून शासकीय जागा हडप करीत असल्याची घटना दिनांक १५ डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाकडे अनेक सामाजिक संस्था व आर टी आई कार्यकर्ते ह्यांनी तक्रार दाखल करूनही याविरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट सनदद्वारे शासकीय जागा हडप करणाऱ्यावर संबंधित विभागाच्या वतीने कोणती कारवाई करण्यात आलेली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०३-२०१७) :** (१) बनावट कागदपत्राच्या आधारे सनद तयार केल्यासंबंधीची तक्रार फेब्रुवारी, २०१५ मध्ये प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत सीमा शुल्क चुकवून परदेशी बनावटीच्या वाहनांची विक्री करणारे रॅकेट असल्याबाबत**

**(१३) ४६२१८ (१७-०५-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सीमा शुल्क चुकवून परदेशी बनावटीच्या आठ वाहनांची विक्री करणारे रॅकेट कार्यान्वित असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनांची किंमत सुमारे २३ लाख रुपये असून या वाहनांचे सुट्टे भाग हे आयात करणाऱ्या कंटेनरमधून मुंबईत आणून त्याची जोडणी करुन ही वाहने दक्षिण मुंबईतील डोंगरी व मुसाफिरखाना परिसरातील एका ठिकाणी विक्रीसाठी ठेवण्यात येत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परदेशी बनावटीची वाहने विक्रीसाठी मुंबईत आणणाऱ्या तस्कऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०३-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) सदर प्रकरणी येलोगेट पोलिस ठाणे येथे गु.र.नं.०५/२०१६ भा.दं.वि. संहिता कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांच्या समृध्दीसाठी स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करण्याची केलेली मागणी**

**(१४) ५१६१८ (२८-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या समृध्दीसाठी स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती राज्यातील शेतकऱ्यांच्या समृध्दीसाठी स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) हे खरे हे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाने प्रा.एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारशींवर केंद्रातील विविध मंत्रालयीन व देशातील सर्व राज्य यांच्याशी चर्चा करुन केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठीचे राष्ट्रीय कृषी धोरण २००७ प्रसिध्द केले. त्यातील ६६ शिफारशी राज्याशी संबंधित असून, सदर शिफारशी जलसंधारण विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, कृषि व पदुम विभाग, जलसंपदा विभाग, नगर विकास विभाग, उद्योग विभाग, आदिवासी विकास विभाग यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणात आंबा प्रक्रिया तसेच फळ प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत**

**(१५) ५४००३ (२०-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात जळगांवच्या जैन उदयोग समुहाच्या माध्यमातून आंबा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील अन्य फळांवर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारणाऱ्या व्यवसायिकांना विशेष सवलती देण्यात येतील असेही जाहीर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जैन उद्योग समुहाकडून कोकणात आंबा प्रक्रिया केंद्र उभारण्याचा प्रस्ताव अद्याप सादर करण्यात आला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये खरीप हंगामापासून पंतप्रधान पिक विमा योजना लागू करण्याबाबत**

**(१६) ५५२२० (२०-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने येत्या खरीप हंगामापासून पंतप्रधान पिक विमा योजना राज्यातील फळबागा, खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी लागू करण्याचा निर्णय दिनांक १८ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच सदर योजना कोणकोणत्या फळबागेसाठी व कोणकोणत्या खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी लागू करण्यात आली असून त्याची ठळक व वैशिष्टये काय आहेत व ती कोणत्या विमा कंपनीतर्फे राबविण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सदरहू योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०३-२०१७) :** (१) राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू करण्याचा निर्णय दिनांक २९.०४.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत असून योजनेंतर्गत भाग, ख.ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, सुर्यफूल, कारळे, कापूस व ख.कांदा अशी १५ पिके अधिसूचित करण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत १५ विमा कंपन्यांना देण्यात आली आहे. सदर १५ विमा कंपन्यांना मान्यता देण्यात आली आहे. सदर १५ विमा कंपन्यांपैकी

खरीप २०१६ मध्ये भारतीय कृषि विमा कंपनी लि., रिलायन्स जनरल इंशुरन्स कंपनी लि., इफको टोकीयो जनरल इन्शुरन्स कंपनी व एच.डी.एफ.सी. ईर्गो इन्शुरन्स कंपनी लि. या ४ या विमा कंपन्यांची निवड करण्यात आली असून त्यांचा मार्फत योजना राबविण्यात येत आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित पिक विमा योजने मृगबहार हंगामामध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू व पेरु या ५ फळपिकांसाठी व आंबिया बहार हंगामामध्ये द्राक्ष, डाळिंब, संत्रा, मोसंबी, आंबा, केळी, पेरु, काजू व लिंबू या ९ फळपिकांसाठी राबविण्यात येत आहे.

योजना एरिया अ‍ॅप्रोच क्लस्टर पध्दतीने राबविली जाणार. त्यामध्ये महसूल मंडळ हा घटक धरण्यात येतो. विमा संरक्षित रक्कम ही प्रत्येक फळपिकाच्या मंजूर कर्ज मर्यादेइतकी राहील. कर्जदार शेतकऱ्यांना योजना बंधनकारक, बिगर कर्जदारांना ऐच्छिक आहे. नुकसान भरपाईचे दायीत्व संबंधित सहभागी विमा कंपन्यांवर आहे.

सदर योजना ही मृग बहरामध्ये इफको टोकीयो व रिलायन्स जनरल इन्शुरन्स लि.तसेच आंबिया बहारामध्ये बजाज अलान्झ व श्रीराम जनरल इन्शुरन्स लि.या विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही खरीप हंगाम २०१६ पासून ५ जुलै, २०१६ व १६ जुलै, २०१६ च्या शासननिर्णयान्वये राज्यात क्षेत्र हा घटक धरुन राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हमातील मच्छिमारांसाठी डिझेल विक्रीवर परतावा निधीसाठी जादा तरतूद करणेबाबत

**(१७) ५५२४६ (१२-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील ६ सागरी जिल्हयांपैकी रायगड जिल्हयात मच्छिमार नौकांची संख्या जास्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ पासून अनेक विक्रीकर परतावा प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ व २०१५ ची सर्व डिझेल विक्रीकर परतावा प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची चालू आर्थिक वर्षात तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी रु. ६०.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय पुरवणी मागणीद्वारे निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्याचे मागणीच्या प्रमाणात निधी वितरणाचे प्रस्ताव मंजूर करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत वाहनसंचार प्रतिबंध अधिभार किंवा वाहन प्रवेश शुल्क आकारणी करण्याबाबत**

**(१८) ५५९३८ (२४-०८-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत आता वाहनगर्दी व वाहनकोंडी प्रमाणाबाहेर गेली असल्याने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे वाहनसंचार प्रतिबंध अधिभार किंवा वाहन प्रवेश शुल्क आकारणी असे उपाय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०३-२०१७) :** (१) मुंबई शहरातील वाहतुक कोडींबाबत जनहित याचिका क्र. १८/२०१० मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेत वाहन गर्दी व वाहन कोंडी प्रमाणाबाहेर गेली असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे.
(२) मोटार वान कायद्यानुसार वाहन संचार प्रतिबंध अधिभार अथवा वाहन प्रवेश शुल्क आकारण्याची तरतुद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खरेदी दस्त झाल्यानंतर तात्काळ फेरफार उतारा व सातबारा देण्यासाठी सुरु केलेल्या ई-फेरफारच्या नोंदीसाठी सर्व्हरची क्षमता अपुरी पडत असल्याबाबत**

**(१९) ५७७१० (१९-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरेदी दस्त झाल्यानंतर तात्काळ फेरफार उतारा व सातबारा देण्यासाठी सुरु केलेल्या ई-फेरफारच्या नोंदीसाठी सर्व्हरची क्षमता अपुरी पडत असल्याने फेरफार व सातबारा उताऱ्यामध्ये मोठया चुका होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चुकांच्या दुरुस्तीसाठी एनआयसीने तयार केलेले नवे पॉईट मॅच्युल तातडीने सर्व तहसिल कार्यालयांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०३-२०१७) :** (१), (२) व (३) अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन "ई-फेरफार" प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला असून त्या अनुषंगाने, राज्यात खरेदी दस्त झाल्यानंतर तात्काळ उतारा व सातबारा देण्यासाठी सुरु केलेल्या ई-फेरफाराच्या नोंदीसाठी सर्व्हरची क्षमता अपुरी पडत असल्याने स्टेट डेटा सेंटर, मुंबई येथे नविन हार्डवेअर स्थापित करण्यात आले. तसेच स्टेट डेटा सेंटर मधील तीनही सर्व्हरचा RAM वाढविण्याची कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभागाकडून करण्यात आली. तद्नंतर प्रत्येक विभागाकरीता स्वतंत्र डाटा सर्व्हर व प्रत्येक विभागाकरीता स्वतंत्र डाटा सर्व्हर व प्रत्येक जिल्ह्याकरीता वेब सर्व्हर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच डाटा सर्व्हरवर विभागनिहाय डाटा अपलोड करण्यात आला आहे. जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह "ई-फेरफार" वर्कस्टेशन्स स्थापन करण्यात आली आहेत. ज्या मंडळस्तरावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही तेथे सॅटेलाईटद्वारे कनेक्टीव्हीटी पुरविण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत.

जेथे संबंधित कर्मचाऱ्यांकडे आवश्यक ते हार्डवेअर (लॅपटॉप/प्रिंटर्स) उपलब्ध नाही अथवा पुरविण्यात आलेले हार्डवेअर कालबाह्य झाले आहे अशा प्रकरणी ते संबंधितांना पुरविण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावरुन सुरु आहे. संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्रीच्या व डाटा कन्व्हर्जनच्या काही ठिकाणी आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याकरीता "एडीट मोड्युल" ची सुविधा तलाठ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली असून सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना एडिट मॉड्यूलचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच जिल्हास्तरावर निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी (तांत्रिक मार्गदर्शक) यांच्या सहभागाने हेल्प डेस्क स्थापन करण्यात आले असून त्यांच्याकडून तांत्रिक अडचणीच्या निवारणार्थ मार्गदर्शन करण्यात येते.

तसेच संगणकीकृत गा.न.नं.७/१२ वितरीत करण्यात काही ठिकाणी अद्यापही येत असलेल्या अडचणी विचारात घेता, "एडीट मोड्यूल" च्या माध्यमातून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या होईपर्यंत तसेच, जेथे तांत्रिक कारणांस्तव "ई-फेरफार" प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ च्या उताऱ्यांचे प्रिंट आऊट काढून अर्जदारांस वितरीत करणे शक्य होत नसेल तेथे, आता एक विशेष बाब म्हणून, केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेती विषयक प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यास दि.२८/०२/२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली असून ही मुदत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

"ई-फेरफार" प्रणाली राबविण्या संदर्भातील सर्व अडचणींवर मात करुन तीच्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासन प्रयत्नशील आहे.

---

**मु.पो.रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.१०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७८ या महार वतनी जमिनी मूळ वारसाच्या नावे करण्याबाबत**

**(२०) ५९६९४ (१९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील महार वतनदारीची नवीन शर्तीची इनाम जमीन सव्हे क्रमांक १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७८ ही जानू मुकूंद महार यांना मिळालेली असून जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर देखील त्यांची तशी नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरफार क्रमांक ८०७ नुसार सदर जमिनीचे वारस श्रीमती कांताबाई रामचंद्र गायकवाड, श्री.यशवंत जानु जाधव यांची नोंद असून या इनाम जमिनीला फेरफार क्रमांक ६२ नुसार कुळ नसलेल्या व्यक्तिंच्या नावे शासकीय अधिकाऱ्यांच्या सगनमताने अवैधरित्या अन्य व्यक्तींच्या नावे कुळ लावण्यात आलेआहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर जमिनी जानू मुकूंद महार यांच्या मूळ वारसदारांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०३-२०१७) :** (१) मौजे रायते, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७८ या जमिनी महार वतनाच्या असल्याबाबत कोणतेही फेरफार अभिलेखात दिसून येत नाहीत. तसेच याबाबत इनाम रजिस्टरला नोंद दिसून येत नाही.

(२), (३) व (४) जानू मुकूंद महार यांच्या मौजे रायते येथील स.नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७१/७ या मिळकतींच्या गाव नमुना नंबर ७/१२ मध्ये फेरफार क्र. ६२ अन्वये शंकर राघो पवार यांचे नाव संरक्षित कुळ म्हणून नोंद आहे. तसेच, फेरफार क्र. ८०७, दि.०५/०५/१९७६ अन्वये या मिळकतीस जानू मुकूंद जाधव यांचे वारस म्हणून (१) श्रीमती भागाबाई जानू जाधव-पत्नी (२) सौ.कांताबाई रामचंद्र-मुलगी, (३) यशवंत जानू जाधव-मुलगा व (४) मुकूंद जानू जाधव-मुलगा यांच्या नावांची नोंद झाली आहे.

मौजे रायते येथील स.नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७८ या मिळकतींसंदर्भात कुळांच्या वारसांनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमामधील कलम ३२ ग अन्वये दाखल केलेला दावा तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, कल्याण यांनी दि.३१/०१/२००८ च्या आदेशान्वये मान्य केला असून फेरफार क्र.१४५३, दि.०१/०२/२००८ नुसार कलम ३२ ग ची नोंद अधिकार अभिलेखात घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मत्सोत्पाद्नात मोठ्या प्रमाणात घट झाली असल्याबाबत**

**(२१) ६२०९४ (१२-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मत्सोत्पाद्नात मोठ्या प्रमाणात घट झाली असल्याचे मत्स्य विभागाच्या आकडेवारीवरून दिनांक २१ जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातील ट्रोलर्स चे अतिक्रमण व वाढते यांत्रिकीकरण पर्ससीन नेट मासेमारीच्या वाढत्या अतिक्रमणामुळे मत्स्यबीजाची हानी असल्याने मत्स्योत्पदनात घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या मत्स्योत्पद्नात वाढ होण्यासाठी शासनाने कोणती कारवाई व उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) डॉ.सोमवंशी समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ५.२.२०१६ व दिनांक ८.२.२०१६ व दिनांक १०.१.२०१७ च्या अधिसूचनेनुसार राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन व ट्रॉलीस मासेमारीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर अधिसूचना निर्गमित करुन पर्ससीन व ट्रॉलींग मासेमारी मर्यादा घालण्यात आल्या आहेत. तसेच राज्याच्या ७ सागरी जिल्ह्यांसाठी ५ गस्ती नौका भाड्याने घेण्यात आलेल्या असून त्यांच्या सहाय्याने परराज्यातील ट्रॉलर्स राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रातील अतिक्रमण आणि पर्ससीन नेटद्वारे निषिध्द क्षेत्रात मासेमारी करताना आढळल्यास त्याच्या विरुध्द महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ नुसार कार्यवाही करण्यात येते.

---

**वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शासनाने ऑनलाईन सात-बारा सुरु केलेले संकेतस्थळ बंद असल्याबाबत**

**(२२) ६२१२५ (१९-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शासनाने ऑनलाईन ७/१२ सुरु केला आहे परंतू शेतकरी पीक कर्ज पुनर्गठनासह विविध कामांसाठी ७/१२ काढण्यासाठी गेले असता मागील पाच ते सहा दिवसापासून ७/१२ चे संकेतस्थळ बंद असल्याने संबंधित जिल्ह्यातील शेतकऱ्यांची गैरसोय, होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ७/१२ ऑनलाईन सुरु केल्यामुळे हस्तलिखित ७/१२ ६-ड, ८-अ हे दाखले देणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने ऑनलाईन संकेतस्थळ बंद झाल्याने हस्तलिखित ७/१२ ६ड, ८अ हे दाखले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०३-२०१७) :** (१), (२), (३) व (४) ई-फेरफार कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता ज्या तालुक्यांच्या संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला आहे, त्या तालुकयात हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ वितरीत करणे बंद करण्यात येते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे जून महिन्यामध्ये ६ दिवस संकेतस्थळ बंद पडल्यामुळे ६ दिवस गा.न.नं.७/१२ उताऱ्याच्या प्रती वितरीत करण्यास अडचणी निर्माण झालेल्या होत्या. परंतु, सदरचे संकेतस्थळ त्वरीत पुर्ववत करण्यात येऊन गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यात आले आहेत. जेथे तांत्रिक कारणांमुळे संगणकीकृत गा.न.नं.७/१२ वितरीत करणे शक्य नाही तेथे शेती विषयक प्रयोजनासाठी हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरित करण्यास दि.२८/०२/२०१७ पर्यंत मुभा देण्यात आलेली होती. आवश्यक तेथे हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यास पुढे मुदतवाढ देण्याबाबतची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील लेखा अधिकाऱ्याने लेखा अहवालात त्रुटी न दाखविण्यासाठी लाच घेतल्याबाबत

**(२३) ६२९१४ (२०-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील लेखा अधिकाऱ्याने लेखा अहवालात त्रुटी न दाखविण्यासाठी लाच घेतल्याचे माहे मे २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ असे प्रकार नेहमीच होत असतात, हे ही खरे आहे हे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती अशा प्रकारे गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनासने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-११-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक, यवतमाळ येथील पथकाने डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील लेखाधिकाऱ्यास सापळा रचून दि.०६.०५.२०१६ रोजी पोलीसांनी अटक केल्यानंतर सदर दोषी लेखाधिकाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई गोरेगाव (पूर्व) येथील ओर दुग्ध डेअरीतील चिलपॉवर खात्यातील कॉम्प्रेसरची मोटर नादुरूस्त झाल्याबाबत**

**(२४) ६२९६४ (१२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **दुग्धव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगाव (पूर्व) येथील ओर दुग्ध डेअरीतील चिलपॉवर खात्यातील कॉम्प्रेसरची मोटर नादुरूस्त झाल्याने दिनांक २५ मे, २०१६ पासून रोजचे सुमारे १० ते १२ हजार लिटर दुधाचे उत्पादन ठप्प झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॉम्प्रेसर मोटर दुरूस्त होऊन दुग्ध उत्पादन सुरळीत सुरू झाले नाही तर संपूर्ण आरे वसाहतीत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कामगारांनी प्रभारी व्यवस्थापक यांना एका बैठकीत दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कॉम्प्रेसर मोटर दुरुस्ती करुन दुग्ध उत्पादन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-११-२०१६) :** (१) आरे डेअरीतील चिल्ड वॉटर विभागातील कॉम्प्रेसरची मोटार नादुरुस्त झाल्यामुळे दैनंदिन कामकाज दि.२५/०५/२०१६ पासून प्रभावित झाले होते.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) मोटार नादुरुस्त झाल्याने आरे दुग्धशाळेतील प्रक्रीया व पॅकिंगचे काम वरळी दुग्धशाळेतून करण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आली व ग्राहकांना वेळेत नियमितपणे दुधाचा पुरवठा करण्यात आला आहे. सद्यस्थितीत पर्यायी मोटार बसविण्यात आली असून दुग्धशाळेचे काम सुरुळीतपणे सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयात अतिरिक्त कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(२५) ६४८५२ (२०-०८-२०१६). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्याचे प्रमाण वाढले असल्याने भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी नागपूर जिल्हयात अतिरिक्त कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी अधिसूचना काढलेली आहे व केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे मुख्य कार्यालय नागपूर येथे असून त्याच्या अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्राचा जास्त प्रमाणात संपर्क होत नसल्याने कृषी विषयक आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती मिळत नसून नागपूर जिल्हयात एक कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी जिल्हयातील शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हयात असलेल्या १४ तालुक्यांची संख्या तसेच शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी नागपूर जिल्हयात अतिरिक्त कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी दिलेली परवानगी, या सर्व बाबी लक्षात घेता शासनाकडून नागपूर जिल्हयात अतिरिक्त कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-११-२०१६) :** (१) भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या दि.२३/१२/२०१५ च्या पत्रान्वये महाराष्ट्रातील मोठ्या ५ जिल्हयात अतिरिक्त कृषि विज्ञान केंद्र स्थापनेसाठी अर्ज मागविण्यात आल्याचे दिसून येते, यामध्ये नागपूरचाही समावेश आहे. केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे मुख्य कार्यालय नागपूर येथे असून त्यांच्या अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र आहे.

(२) मा.आ.डॉ.आशिष देशमुख स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी काटोल येथे कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्याबाबत मागणी केलेली आहे.

(३) व (४) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचेकडून प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल येथे कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदकडे सादर करण्यात आला आहे. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांचेकडून अद्याप प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्हयात प्राणी क्रूरता प्रतिबंधक समिती स्थापन करण्याचे केंद्र सरकारने जिल्हाधिकारी व पशुसंवर्धन आयुक्तांना आदेश दिल्याबाबत**

**(२६) ६५०३६ (२१-१०-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक समिती स्थापन करण्याचे आदेश केंद्र सरकारने जिल्हाधिकारी व पशुसंवर्धन आयुक्तांना दिनांक २६ मार्च, २००१ रोजी अर्धशासकीय पत्राद्वारे दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १५ वर्षापूर्वी दिलेल्या आदेशानुसार राज्यातील ठाणे, मुंबई, पुणे या तीन जिल्ह्यातच ही समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अन्य जिल्ह्यात ही समिती स्थापन करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राण्यांचे संवर्धन व त्यांचेवरील उपचार करण्यासाठी उर्वरित जिल्ह्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक समिती स्थापन करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०९-०२-२०१७) :** (१) होय.

केंद्र शासनाने क्र. १९/१/२०००-AWD, दि.२६ मार्च, २००१ अन्वये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये “प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हा स्तरीय समिती” स्थापन करण्याबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय क्र.एमएसडीसी-२०००/प्र.क्र.१०७/पदुम-३, दि.१९.९.२००० अन्वये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये “प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हा स्तरीय समिती” स्थापन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये “प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हा स्तरीय समिती” स्थापन करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील पुनाडे खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबत

**(२७) ६५१२१ (१६-१२-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील पुनाडे खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबतचा प्रस्ताव पर्यावरण खात्याला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या समवेत झालेल्या बैठकीत या योजना ओएनजीसी व जेएनपीटी, सिडको यांच्या मार्फत दुरुस्त करुन घेण्यात यावेत, असा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुनाडे खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०१-२०१७) :** (१), (२) व (३) होय.

दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या समवेत झालेल्या बैठकीत पुनाडे खारभूमी योजनेच्या दुरुस्तीसाठी CSR अंतर्गत ओएनजीसी या खाजगी कंपनीकडे निधीची मागणी केली आहे.

(४) पुनाडे खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबतचा प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परिवहन विभागाच्या अर्थपूर्ण कामगिरीमुळे ६४१ कोटीचा महसूल बुडल्याबाबत**

**(२८) ६५१७९ (११-११-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या मालवाहू वाहनांकडून करवसुली करण्यासाठी महाराष्ट्राच्या सिमेवर १३ ठिकाणी सिमानाके (बॉर्डर चेकपोस्ट) महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट नेटवर्क लि. या कंपनीकडून सुमारे एक हजार कोटीची गुंतवणूक करुन उभारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व सिमानाक्यांवर परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अर्थपूर्ण व्यवहारामुळे शासनाच्या तब्बल ६४१ कोटीचा महसूल बुडाल्याची बाब एमएसआरडीसीने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान परिवहन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चेकपोस्ट उभारण्याकरिता गुंतवणूक करणाऱ्या कंपनीला नुकसान भरपाई अथवा कंत्राटाचा कालावधी वाढवून देण्याची वेळ शासनावर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०२-२०१७) :** (१) व (२) शासनाने दि. २५ मार्च, २००८ रोजी परिवहन विभागाच्या एकूण २२ सीमा तपासणी नाक्यांच्या आधुनिकीकरणाचा निर्णय घेतला असून त्यासाठी महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट नेटवर्क लि.या सेवा पुरवठादाराची निवड करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत १३ तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण पुर्ण झाले आहे.

सेवापुरवठादाराने तपासणी नाक्यावर जादाभार असलेल्या वाहनातील जादा माल न उतरविल्यामुळे, सदर जादा माल उतरवून घेण्यासाठी येणारा खर्च सेवापुरवठादारास न मिळाल्यामुळे रु. ६४१.४३ कोटीचे सेवा पुरवठेदाराचे नुकसान झाल्याचे कळविले आहे.

सदर प्रकल्पासाठी सेवापुरवठेदाराने केलेल्या गुंतवणूकीची भरपाई मिळण्यासाठी सीमा तपासणी नाक्यातून जाणाऱ्या वाहनांकडून सेवापुरठेदारास सेवा शुल्क वसूल करण्याची परवानगी आहे. त्यानुसार सेवापुरवठेदाराने सेवा शुल्क वसूल केलेले आहे.

(३) व (४) या संदर्भात सहपरिवहन आयुक्त यांच्यास्तरावर प्राथमिक छाननी करण्यात आली आहे. सेवापुरवठाराने जून, २०१३ ते मार्च, २०१६ या कालावधीसाठी सदर नुकसान दर्शविले असून सेवापुरवठदाराने चुकीच्या गृहितकांच्या आधारे नुकसानीची गणना केल्याचे प्राथमिक छाननीत आढळून आले आहे. त्यामुळे यासंदर्भात सीमा तपासणी नाक्यावरील जून, २०१३ पासूनची जादाभार विषयक वाहनांची संगणकीय माहिती घेऊन त्यांची तपशीलवार छाननी करण्याची बाब कार्यवाहीखाली आह. तसेच, सीमा तपासणी नाक्यावरील गुणात्मक वाढ होण्यासाठी सुधारित आदर्श कार्यपध्दती लागू करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय नेरूळ येथे सुरु करणेबाबत**

**(२९) ६५६२० (१६-१२-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी सिडकोने नेरूळ सेक्टर - १३, येथे उपलब्ध करून दिलेल्या भूखंडाची रक्कम परिवहन विभागाने सिडकोला अदा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१७) :** (१) होय.

(२) शासन निर्णय क्र. पकाबां-१२१३/प्र.क्र.४०६/परि-४, दि. ०७.११.२०१६ अन्वये उप प्रादेशिक परिवहन कार्यलय, नवी मुंबई यांच्या नेरुळ येथील जागेवर कार्यालयीन इमारत बांधकामासाठी रु. ८,९४,०५,०७०/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रकास व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत**

**(३०) ६५८५५ (१०-११-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सन २०१४-२०१५ च्या अवकाळी पावसामुळे आंबा व काजू पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अदयापी नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील २० हजार ७१८.२० हेक्टर आंबा व ११ हजार ९६.६१ क्षेत्रावरील सुमारे ६४ हजार, ८७४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून, या जिल्हयातील नुकसानग्रस्त आंबा व काजू पीक शेतकऱ्यांना नुकसानीपोटी शासनाने ७९ कोटी ५३ लाख ७५ रूपये मंजूर करून ते अनुदान जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द केले असतानाही आजमितीस ३६ कोटी २४ लाख १५ हजार ५१५ एवढी रक्कम नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना मिळणे बाकी आहे, तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्यातील सुमारे २ कोटी २२ लाख ७५ हजारांची तसेच अन्य तालुक्यातील नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना कोटयवधीची रक्कम मिळणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नुकसानग्रस्त बागायदारांनी नुकसानींची रक्कम त्वरीत मिळावी म्हणून जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे जुलै २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदरहू बागायतदारांना त्वरित नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांची मागणी अद्याप अप्राप्त आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) रत्नागिरी जिल्ह्याच्या मागणीप्रमाणे शासन निर्णय, क्र. एससीवाय-०४/२०१६/प्र.क्र.३४/म-११, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ अन्वये रु.३६,२४,५१,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून, सदर निधी थेट शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

### राज्यात एस.टी. महामंडळातील १५ हजार रिक्त जागा भरण्याबाबत

**(३१) ६६०९८ (१६-१२-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस.टी. महामंडळात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने चालक-वाहक यांना जादाची ड्युटी करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. महामंडळामार्फत असलेल्या रिक्त जागांची भरती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) चालक तथा वाहक (कनिष्ठ)-७९२९, लिपिक-टंकलेखक (कनिष्ठ)-२६४८, सहाय्यक (कनिष्ठ)-३२९३ या पदांची सरळसेवा भरतीकरीता ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्याबाबत दिनांक ०५.०१.२०१७ रोजी महामंडळाने जाहिरात दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुही (जि.नागपूर) तालुक्यातील गोरक्षण ट्रस्टच्या गोशाळेत गाई मरणासन्न अवस्थेत आढल्याबाबत

**(३२) ६६२६९ (१६-१२-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील कुही तालुक्यातील संघाशी संबंधित बजरंग दलाच्या माजी पदाधिकाऱ्यांने गोसेवेच्या नावाखाली गायीची विटंबना केली असून गोसंवर्धनासाठी गोळा

केलेल्या गाईकडे दुर्लक्ष केल्याने तेथील गाईच्या मृत्युत वाढ झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर स्वंयघोषित गोरक्षकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०२-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात कार्यरत असलेल्या गोरक्षण ट्रस्टच्या गोशाळेत अनेक गाई मरणासन्न अवस्थेत असलेबाबतचे वृत्त खाजगी वृत्तवाहिनीवरून प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्रादेशिक सहआयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता सदर बातमीत कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गोमांस बंदीवर देखरेख ठेवण्यासाठी स्वयंसेवक म्हणून राज्यभरातून आलेल्या अर्जाच्या पडताळणीबाबत**

**(३३) ६६३६४ (२७-०१-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोमांस बंदीवर देखरेख ठेवण्यासाठी स्वयंसेवक म्हणून अर्ज करण्याच्या शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या जाहीरातीनुसार राज्यभरातून २३८८ अर्ज आले असल्याचे माहे आँगस्ट २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठ्या संख्येतील अर्जाची पडताळणी कशी करायची याबाबत काही लेखी मार्गदर्शक तत्वे नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या अर्जाचा निपटारा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शक तत्वे घालून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) राज्यभरात महाराष्ट्र प्राणी छळ प्रतिबंधक कायदा,१९६० व महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा, १९७६ मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने पशुकल्याण अधिकारी या पदाकरिता अर्ज करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयाकडून पशुप्रेमिंना आवाहन केले होते. त्यानुसार राज्यभरातून सुमारे २२०० अर्ज आयुक्त पशुसवंर्धन यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.४/२००५ मध्ये दि.६ ऑक्टोबर, २००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. धर्माधिकारी यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदे सनियंत्रण समितीची दि.५.१२.२००५ च्या शासन निणर्यान्वये स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीस महाराष्ट्र राज्यामध्ये प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, १९६० व महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा, १९७६ मधील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने मानद पशुकल्याण अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने प्राधिकृत केले असून त्यांना या मानद पदासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्यानुसार पुढील कर्मचारी सदरहू समितीकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हळगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे कृषि विद्यापीठ सुरु करण्याबाबत**

**(३४) ६६३८५ (१६-१२-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हळगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने मौजे हळगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१०-०३-२०१७) :** (१), (२) व (३) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. मफुकृवि १४१५/प्र.क्र.२२८/७-अे दि. ५ जुलै, २०१६ अन्वये महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालया हाळगांव ता.जामखेड, जि.अहमदनगर येथे स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच या महाविद्यालयाची सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रियाही राबविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालनाला हमी घेत कर्ज उपलब्ध करून देण्याचे नाकारल्याने बहुतांशी सहकारी संस्थांनी हा व्यवसाय बंद केल्याबाबत**

**(३५) ६६४८४ (१७-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालनाला चालना देण्यासाठी सहकारी संस्थाकडून हमी घेत कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या धोरणात शासनाने बदल करुन या संस्थांना हमी देण्याचे नाकारल्याने बहुतांशी सहकारी संस्थांनी हा व्यवसाय बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कुक्कुटपालन संस्थांकडे सुमारे १५० कोटी रुपयांची थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे अनेक लोक बेरोजगार होणार आहेत या संदर्भात शासनाने विचार केला आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) नाही.

दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सहकारी संस्थांकडून हमी घेत राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली या संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत नाही.
(२) राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत ७० सहकारी कुक्कुटपालन संस्थांकडे माहे मार्च, २०१६ अखेर एकूण रु.१३१.०३६ कोटी थकबाकी आहे.
(३), (४) व (५) नाही.

राज्यामध्ये कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरीता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम, राज्यस्तरीय सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेंतर्गत १००० मांसल कुक्कुटपक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरु करणे, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानामधील पशुधन विकास उप-अभियानांतर्गत ग्रामीण परसातील कुक्कुटपालनास चालना देणे, तसेच, उद्योजकता विकास व रोजगार निर्मिती या अंतर्गत कुक्कुटपालनाच्या योजना राबविण्यात येत आहेत.

---

## ठिबक सिंचनासाठी मिळणारे अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत

**(३६) ६७७१८ (१६-१२-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने गेली चार वर्षे सातत्याने दुष्काळी परिस्थितीशी मुकाबला करणाऱ्या राज्यात ठिबक सिंचन सक्तीचे करण्यावर भर दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र ज्या शेतकऱ्यांनी सरकारची पूर्वमंजूरी घेऊन ठिबक सिंचन योजना राबविल्या ते शेतकरी तीन वर्षे अनुदानापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी निर्णय घेवून सदर शेतकऱ्यांना त्यांचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकारणाने दि.२५ जून,२०१५ च्या अधिसूचनेन्वये १) टेंभु उपसा सिंचन योजना, २) भीमा (उजनी), ३) मुळा, ४) निम्न मानर, ५) हतनूर, ६) उर्ध्व ऊस, ७) कान्होळी नाला (नागपूर) ८) अंबोली सिंधुदुर्ग प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील बारमाही पिकांना जून २०१८ पर्यत सुक्ष्म सिंचनसारख्या सिंचन पदधतीचा अवलंब करण्याचे अनिवार्य केले आहे.
(२) सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील पुर्व संमती दिलेले रु.१८५.२२ कोटी एवढया रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.
(३) प्रलंबित प्रकरणांसाठी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला येथे पशु वैद्यकीय विज्ञान पदवी महाविद्यालय सुरु करण्याबत

**(३७) ६७८९० (१६-१२-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथे शासनाने पशु वैद्यकीय विज्ञान पदवी महाविद्यालयाच्या मंजुरीची घोषणा अर्थ संकल्पिय अधिवेशन २०१६ दरम्यान केली असून, सदर महाविद्यालय जागे अभावी होऊ शकत नाही असा अहवाल कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी शासनाला कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशु वैद्यकीय विज्ञान पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाचे चमूने अकोला येथे पाहणी दौरा करून, स्थानिक कृषी विद्यापीठाच्या जागेची मागणी आपल्या अहवालात केली, हे खरे आहे काय,
(३) उक्त, अकोला शहराला लागून बोरगाव (मंजू) शिवारात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या मालकीची सुमारे १५२ हेक्टर जमीन आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विद्यापीठाची बोरगाव (मंजू) या राष्ट्रीय महामार्गावरील शिवारात, शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालय व कृषी विद्यापीठ परिसरालगत असलेली तसेच पुढील शैक्षणिक विस्ताराचे उद्देशपुर्तीसाठी सुयोग्य जागा असतांना, शासन सदर जागेवर तातडीने बांधकाम सुरु करणार, हे खरे आहे काय,
(५) अकोला येथे पशु वैद्यकीय पदुत्तर महाविद्यालय असल्याने पुढील वर्षाच्या (२०१७-१८) शैक्षणिक वर्षात पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविणार आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर पदवी महाविद्यालय त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०२-२०१७) :** (१), (२) व (३) अकोला येथे पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची वाशिम रोड येथील जागा सुयोग्य असल्याचा अहवाल महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर चे समितीने दिला आहे. त्यानुसार महाविद्यालयाकरीता जमिन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) महाविद्यालयास जागा व सोयी सुविधा उपलब्ध झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा, मोझरी व तळेगांव (जि.अमरावती) येथे एस.टी. बस थांबविण्याबाबत**

**(३८) ६७९३५ (१६-१२-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीला केवळ नागपूरसाठी विना थांबा सुटणाऱ्या एसटी बसमुळे विद्यार्थ्यांसह, प्रवाशांचे नुकसान होत असल्याने ऑल इंडिया स्टुण्डट फेडरेशनने एस.टी. महामंडळाच्या अमरावती जिल्हा व्यवस्थापनाला निवेदन दिले असल्याचे माहे जुलै, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हायवेवरील तिवसा, मोझरी, तळेगांव येथे या तीनही ठिकाणी सदर एस.टी. बस थांबावी यासाठी परिवहन विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१७) :** (१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळामार्फत अमरावती-नागपूर या मार्गावर दैनंदिन विनावाहक २८ व तिवसा, मोझरी येथे थांबा असणाऱ्या एकूण ९५ फेऱ्या चालनात आलेल्या आहेत व प्रवासी मागणीच्या अनुषंगाने सकाळी ०६.१५ व १३.३० वा मोझरी व तिवसा थांबा असणाऱ्या दोन जलद फेऱ्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे मोझरी व तिवसा थांबा घेणाऱ्या एकूण फेऱ्यांच्या संख्येत कपात न करता सदर मार्गावरील फेऱ्यांमध्ये राज्य परिवहन महामाडळाद्वारे वाढ करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-पुणे मार्गावर वातानुकूलित दुमजली बस चालविण्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३९) ६८१३८ (१६-१२-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे मार्गावर वातानुकूलित दुमजली बस चालविण्याचा राज्य परिवहन मंडळाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन मंडळाचे उक्त प्रश्नाबाबत विचाराधीन असलेल्या प्रश्नावर निर्णय घेऊन तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१७) :** (१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळाद्वारे वातानुकूलित दुमजली (डबल डेकर) बसेस चालविण्यासंदर्भात मार्गाची तपासणी करण्यात आली. परंतु उपलब्ध मार्गावर दुमजली (डबल डेकर) बस चालविण्यासंदर्भात तांत्रिक व चालनिय अडचणी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१२ मध्ये आलेल्या बर्ड फ्ल्यूमुळे पोल्ट्री व्यावसायिकांची**
**नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबत**

**(४०) ६८३९८ (२७-०१-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ मध्ये आलेल्या बर्ड फ्ल्यूमुळे पोल्ट्री व्यावसायिकांचे झालेली नुकसान भरपाई भरुन काढण्यासाठी शासनाने परिपत्रक काढून व्यावसायिकांना अनुदान जाहिर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान जाहिर होऊन चार वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापी बहुतांश पोल्ट्री व्यावसायिकांना अनुदान देण्यात आलले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसायिकांना अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे पोल्ट्री व्यावसायिक उध्वस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच व्यावसायिकांना अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१०-०२-२०१७) :** (१) नाही
(२), (३), (४) व (५) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही

---

### कोल्हापुर जिल्हयात खातेदार शेतकऱ्यांचा पीकविमा उतरविणेबाबत

**(४१) ६८६४९ (१६-१२-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्हयात साडेसहा लाख शेतकरी असताना केवळ ९ हजार ८३२ खातेदार शेतकऱ्यांच्या पीक विमा उतरविण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती कोल्हापूर जिल्हयातील खातेदार शेतकऱ्यांचा पूर्णक्षमतेने पीक विमा उतरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०३-२०१७) :** (१) व (२) प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यात खरीप २०१६ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असून सदर योजना कर्जदार शेतकऱ्यांना बंधनकारक तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१६ मध्ये कोल्हापूर जिल्हयातील ८९०५ कर्जदार शेतकरी व १४३८ बिगर कर्जदार शेतकरी अशा एकूण १०,३४३ शेतकऱ्यांनी रु. ४१.७१ लाख विमा हप्ता भरुन ५,४२२ हे. क्षेत्र संरक्षित केले आहे.
(३) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१६ मध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेणेस्तव खरीप शेतकरी मेळावे, प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन योजनेचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आलेली होती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर शहरातील गणेशपेठच्या मध्यवर्ती बस स्थानकावर अस्वच्छता पसरली असल्याने प्रवाश्यांना होत असलेल्या त्रासाबाबत

**(४२) ६९६२२ (१६-१२-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील गणेशपेठच्या मध्यवर्ती बस स्थानकावर अस्वच्छता पसरली असल्याने प्रवाश्यांना त्रास सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी कचऱ्याचा ढिग टाकलेला असून जागोजागी अस्वच्छता तसेच घान पाणी वाहत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच याठिकाणी मोकाट कुत्र्याचा उपद्रव असून जागोजागी खडडे पडल्याने प्रवाश्यांना त्रास सहन करावा लागत असून यामुळे प्रवाशांत भितीचे वातावरण पसरले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती नागपूर शहरातील गणेशपेठच्या मध्यवर्ती बस स्थानकावर स्वच्छता ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०३-२०१७) :** (१), (२) व (३) नाही.
(४) बसस्थानकारवील खड्डे डांबरीकरणाने भरुन घेण्यात आलेले आहेत. तसेच स्वच्छतेकरीता कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडून आगाराच्या देखरेखेखाली बसस्थानकाची दैनंदिन साफसफाई केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील देवरीस्थित परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाच्या आधुनिकीकरणाची निविदा प्रक्रियाची कार्यवाही प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ७०२८३ (१६-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी (जि.गोंदिया) महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाच्या आधुनिकीकरणाकरीता मंजूर झालेला ८० लाख रुपयाच्या निविदा प्रक्रियाची कार्यवाही करण्याबाबत आमगांव मतदार संघातील लोकप्रतिनिधी यांनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ११ महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप शासनाने याबाबत कोणतीच निविदा प्रक्रियावर कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) देवरी येथील बसस्थानकाच्या आधुनिकीकरणाकरीता तज्ञ वास्तुविशारदाची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी तयार केलेल्या नकाशा व अंदाजपत्रकानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परराज्यातून गाई-म्हशीची खरेदी करुन शेतकऱ्यांना दोन गाई, म्हशी देण्याऱ्या योजनेची अंमलबजावणी सुरु करण्याबाबत**

**(४४) ७०४६० (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त भागात विशेषत: मराठवाड्यातील दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी परराज्यातून गाई-म्हशीची खरेदी करुन शेतकऱ्यांना दोन गाई, म्हशी देण्याची योजना शासनाने आखली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा स्वरुप काय आहे व या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, किती शेतकऱ्यांना योजनेचा फायदा होणार आहे,

(४) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२५-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मराडवाडा पॅकेज अंतर्गत पथदर्शी योजना म्हणून सन २०१६-१७ मध्ये जालना जिल्ह्यात सर्वसाधारण अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर (Back ended Subsidy) ०२ संकरीत / देशी गायी / म्हशीच्या गटांचे वाटप एकूण २००० शेतकऱ्यांना करण्यात येणार आहे. योजनेंतर्गत प्रति गायीची किंमत रु. ५६,०००/- व म्हशींची किंमत रु. ६६,०००/- आणि परराज्यातून वाहतुकीसाठी प्रति जनावर वाहतूक खर्च ५,०००/- देखील देय आहे. प्रकल्प स्थापनेच्या पहिल्या वर्षानंतर २० टक्के दुसऱ्या वर्षानंतर २० टक्के व उर्वरित १० टक्के अनुदान तिसऱ्या वर्षानंतर देय आहे. वाटप केलेल्या जनावरांचा राष्ट्रीय विमा उतरविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शेतकरी पशुपालक यांची क्षमता बांधणी / कौशल्य विकासाकरिता पशुसंवर्धनविषयक माहिती, प्रशिक्षण व संवाद या चार दिवसीय कार्यक्रमाचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये आयोजन करण्यात आले होते. आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि. २८.११.२०१६ रोजी अंमलबजावणी अधिकारी यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस भांडूप (प.) लालबहादूरशास्त्री मार्गे येण्याबाबत**

**(४५) ७०८१२ (१६-१२-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.) येथील लालबहादूरशास्त्री मार्गावरुन राज्यात विविध ठिकाणी जाणा-या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस भांडूप (प.) लालबहादूरशास्त्री मार्गे येथून जातात पण परतीच्या प्रवासात भांडूप (प.) लालबहादूरशास्त्री मार्गे येत नसल्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी व प्रादेशिक व्यवस्थापक यांच्याकडे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी लेखी पत्र देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीअंती राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस भांडूप (प.) परतीच्या प्रवासात भांडूप (प.) लालबहादूरशास्त्री मार्गे येण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलांबची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१७) :** (१) होय.
(२) भांडूप (प) बसस्थानकावरुन महामंडळामार्फत सध्या ९ फेऱ्या चालनात आहेत. सदरच्या फेऱ्या लोकप्रतिनिधी व प्रवाशांच्या मागणीच्या अनुषंगाने जाता-येता भांडूप (प) लालबहदूर शास्त्री मार्गे जाण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) येथील तालुका कृषी कार्यालयात तालुका कृषी अधिकाऱ्यासह १७ रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) ७०९५३ (१६-१२-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) येथील तालुका कृषी कार्यालयाचा कारभार वर्षभरापासून २३ पैंकी केवळ ६ कर्मचारी सांभाळत असून येथे तालुका कृषी अधिकऱ्यासह १७ पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-०३-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
तालुका कृषि अधिकारी सोयगाव हे पद दिनांक १६.०६.२०१६ रोजी भरलेले आहे. सदर कार्यालय व अधिनस्त मंडळ कृषि कार्यालयामध्ये एकुण ५० पदे मंजूर असून सध्या १७ पदे रिक्त आहेत.
(२) वरील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विदर्भ व मराठवाडा येथील दुध उत्पादन वाढीसाठी तसेच त्या भागातील उत्पादित दुध संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्याबाबत**

**(४७) ७१५४६ (१६-१२-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विदर्भ व मराठवाडा येथील दुध उत्पादन वाढीसाठी तसेच त्या भागातील उत्पादित दुध संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ संचालित मदर डेअरी फ्रुट अँड व्हेजिटेबल प्रा.लि. या कंपनीशी करार करण्यात आला त्यामुळे या भागातील दोन हजार गावांतील शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचे माहे ऑक्टोबर २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०८-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) विदर्भ व मराठवाडा विभागातील दुग्ध उपादनात वाढ होण्यासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत विशेष दुग्ध प्रकल्प राबविण्यात येत आहे. यासाठी यापूर्वीच नागपुर येथील शासकीय दुग्ध योजनेची दुग्धशाळा राष्ट्रीय दुग्धविकास मंडळास शासनाने हस्तांतरीत केलेली असुन या संदर्भात डिसेंबर, २०१३ मध्ये राष्ट्रीय दुग्धविकास मंडळासमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) येथे जिल्हा उपप्रादेशिक कार्यालय सुरू करण्याची केलेली मागणी**

**(४८) ७१६१८ (१६-१२-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथे जिल्हा उपप्रादेशिक कार्यालय सुरू करण्याची मागणी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०३-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या भाजीपाला आणि फळे नियमन मुक्तीनंतर शेतकरी थेट आपले दुध ग्राहकांना विकणार असल्याबाबत**

**(४९) ७२००७ (१६-१२-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या भाजीपाला आणि फळे नियमन मुक्तीनंतर शेतकरी थेट आपले दुध ग्राहकांना विकणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोरणामुळे मुंबईकरांना ५ ते ६ रूपयांनी स्वस्त दुध मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोरण राज्यातील सर्व महानगरांमध्ये राबविण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, सदर धोरणाचे सर्वसाधारण स्वरूप काय,
(५) असल्यास, या धोरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शासन कोणत्या सुविधा उपलब्ध करून देणार आहे ?

**श्री. महादेव जानकर (०९-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषी व कृषीमालावर आधारित उद्योगांसाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग सुरु करणे बाबत**

**(५०) ७२६०४ (१०-०१-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असलेले कृषी व कृषीमालावर आधारित उद्योगांसाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग सुरु करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

वि.स. २८८ (37)

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.